# पर्यावरण विषयक जाहिर सुनावणीचे इतिवृत

## प्रकल्प प्रवर्तक मे. मातोश्री लक्ष्मी शुगर अँड को-जनरेशेन इंडस्ट्रीज लि., सातलिंग नगर, मु. रुद्येवाडी पो. दुधनी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ४५ किलोलिटर प्रतिदिन क्षमतेच्या प्रकल्पाचा पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत.

प्रकल्प प्रवर्तक मे. मातोश्री लक्ष्मी शुगर अँड को-जनरेशेन इंडस्ट्रीज लि., सातलिंग नगर, मु. रुद्येवाडी पो. दुधनी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील प्रस्तावित, मळीवर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ४५ किलोलिटर प्रतिदिन क्षमतेचा प्रकल्प करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक २५ मे, २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता प्रकल्प कार्यस्थळावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-४०/२०१८, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-१९६४ दि. २२-०५-२०१८ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) श्री. किशोर पवार — अध्यक्ष
अप्पर जिल्हादंडाधिकारी - सोलापूर
(मा. जिल्हादंडाधिकारी, सोलापूर यांचे प्रतिनिधी)

२) श्री. ज. शं. साळंखे — सदस्य
प्र. प्रादेशिक अधिकारी मप्रनि मंडळ - पुणे
(मप्रनि मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) श्री. नवनाथ सं. अवताडे, — समन्वयक
प्र. उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ - सोलापूर

श्री अवताडे, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री अवताडे यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर मे. मातोश्री लक्ष्मी शुगर अँड को-जनरेशेन इंडस्ट्रीज लि., सातलिंग नगर, मु. रुद्देवाडी पो. दुधनी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ४५ किलोलिटर प्रतिदिन करणेबाबत पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीआयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्गात मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. उपरोक्त प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागाच्या तज्ञ मूल्यांकन समितीच्या दिनांक २६ ते २७ सप्टेंबर, २०१६ रोजी आयोजित केलेल्या १३ व्या बैठकीत प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यात आलेली आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक संचार व दैनिक लोकमत मध्ये मराठी व इंग्रजी या भाषेमध्ये दिनांक २४ एप्रिल २०१८ रोजी जाहिर सुनावणी सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, पश्चिम विभाग कार्यालय, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सोलापूर, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, सोलापूर, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर, तहसीलदार-

तहसिल कार्यालय- अक्कलकोट, जिल्हा- सोलापूर, गटविकास अधिकारी- पंचायत समिती, अक्कलकोट, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर, ग्रामपंचायत कार्यालये- रुद्येवाडी, निंबाळ, चिंचोली (म), संगोगी (ब), बोबलाद, दुधनी, मुगळी, ता. अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. समन्वयक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांना एकही आक्षेप प्राप्त झालेला नाही. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. समन्वयक श्री अवताडे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

श्री. किशोर पवार, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या तांत्रिक सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली.

<u>खालील उपस्थितांनी चर्चेत भाग घेतला व त्यांच्या प्रश्नांना/सूचनांना देण्यात आलेली उत्तरेः-</u>

१) **श्री. रामकृष्ण कर्णाकोटी, रा. संगोगी**, यांनी अल्कोहोल साठवणुकी विषयी काय योजना आहेत याची विचारणा केली.

**उत्तर** : सुलक्षना आयरेकर यांनी असे सांगितले की, प्रस्तावित आसवणी प्रकल्पाच्या प्राप्त अल्कोहोल साठवणुकीसाठी ५० घनमीटर क्षमतेचे (९ टाकी) १० घनमीटर क्षमतेचे (३ टाकी) आणि मोठया प्रमाणात साठवणूक असलेल्या ८०० घनमीटर क्षमतेच्या (३ टाकी) आणि २०० घनमीटर क्षमतेच्या (२ टाक्या) बसविण्यात येतील. सदर टाक्या हया माईल्ड स्टील धातू पासून बनविण्यात येतील त्याचबरोबर दररोज उत्पादित होणाऱ्या अल्कोहोलच्या क्षमतेनुसार टाक्या ठरविण्यात येतील.

२) **श्री. सचिन भरते, रा. अक्कलकोट**, यांनी प्रस्तावित प्रकल्पातून उद्भवणाऱ्या विविध प्रकारच्या प्रदूषणाची विचारणा केली.

**उत्तर :** प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी सादरीकरणाद्वारे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या हवा, पाणी, घनकचरा, घातक कचरा, वास, ध्वनी प्रदूषण इत्यादी बाबतच्या प्रदूषणाबाबत व त्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजनांची माहिती सादर केली. त्याचबरोबर प्रस्तावित आसवणीमधून निर्माण होणारे सांडपाणी हे मुख्यत्वे स्पेंटवॉश, स्पेटलिज व इतर सांडपाणी असेल. सदरचे स्पेंटवॉश हे बायोनिथेनेशन प्रकल्प व मल्टीपल इफेक्ट इव्हॅपोरेशन यामध्ये एकाग्र प्रक्रिया करून ते बायो कांपोस्टींगमध्ये वारण्यात येईल तर इतर सांडपाणी जसे कुलींग ब्लोडाऊन, स्पेटलिज इ. हे प्रस्तावित आसवणीच्या कंडेनसेट पॉलिसींग युनीटमध्ये प्रक्रिया केले जाईल त्यांनी असेही सांगितले की, प्रकल्पामधून निघणारे संपूर्ण स्पेंटवॉश बायो कंपोस्टींग प्रक्रियेमध्ये जिरेविले जाईल. त्यामुळे शुन्य द्रव विल्हेवाट साद्य केली जाईल तसेच निर्माण होणारे खत शेतीसाठी वापरले जाईल.

अशा पद्धतीने प्रस्तावित प्रकल्पामध्ये कोणताही नवीन बॉयलर बसविण्यात येणार नसल्यामुळे हवा प्रदूषणाविषयी कोणतीही काळजी करण्याचे कारण नाही. त्याचबरोबर वृक्षारोपण, ध्वनी प्रतिबंधीत वैयक्तिक संरक्षित साधने, सुविधा आणि चांगली निटनेटकी व्यवस्था / देखभाल, पुरेशी साठवणूक, स्पेंटवॉश हाताळणी आणि विल्हेवाट, प्रेसमड आणि ईस्ट स्लज यामुळे ध्वनी प्रदूषण आणि वास उपद्रव प्रतिबंधीत होईल. त्यानंतर घनकचरा आणि घातक कचरा याविषयी असेही सांगितले की, घनकचरा जसे ईस्ट स्लज आणि ईटीपी स्लज हे खत म्हणून वापरले जाईल आणि घातक कचरा की जो स्पेंट ऑईलच्या स्वरूपात असेल तो बॉयलरमध्ये बगॅस बरोबर इंधन म्हणून वापरले जाईल, म्हणून प्रस्तावित प्रकल्पापासून प्रदूषणाचे कोणतेही प्रमुख परिणाम नसतील.

३) **श्री. शंकर सिध्दाराम, रा. दुधनी,** यांनी प्रस्तावित प्रकल्पातून किती प्रमाणात अल्कोहोल निर्माण होईल याविषयी विचारणा केली.
**उत्तर :** सुलक्षना आयरेकर यांनी प्रस्तावित प्रकल्पातून ४५ किलोलीटर प्रतिदिन अल्कोहोला निर्माण होईल असे सांगितले.

४) **श्री. ईनाम सय्यद, रा. अक्कलकोट,** यांनी प्रस्तावति प्रकल्पाद्वारे कोण कोणते सामाजकार्य केले जाईल अशी विचारणा केली.
**उत्तर :** श्री. शिवराज म्हेत्रे, कार्यकारी संचालक, यांनी असे स्पष्टीकरण दिले की, जवळपास ४.५१ कोटी ( एकूण गुंतवणूक § ६८.५० कोटी च्या ६.६ टक्के) एवढी रक्कम सीएसआर साठी राखीव ठेवली आहे. सीएसआर खाली करण्यात येणारे उपक्रम हे अभ्यास क्षेत्रामध्ये करण्यात आलेल्या सवेक्षणावर आधारित असते. सीएसआर अंतर्गत असणारे उपक्रम हे १) पाणी वाचविण्यासाठी ठिबक सिंचन पद्धती (रु. २ कोटी) २) सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा यंत्रणा (रु. ०.५ कोटी). ३) ग्रामीण स्वच्छता ( रु.

०.४० कोटी) ४) प्राथमिक आरोग्य केंद्र आणि अँबुलन्स (०.५० कोटी) ५) अपारंपारिक उर्जा आणि उर्जा संवर्धन इत्यादीसाठी प्रोत्साहित करणेसाठी स्ट्रीट लाईट आणि सोलार लँप सुविधा (०.०६५ कोटी) ६) आजूबाजूच्या गावामध्ये वृक्षारोपण करून महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमामध्ये सहभाग घेणे (रु. ०.३६ कोटी) आणि ७) ऊस कचरा व्यवस्थापन आणि जन जागृती कार्यक्रम (रु. ०.१० कोटी), अशा प्रकारचे उपक्रम आभ्यास क्षेत्रामध्ये राबविले जातील.

५) **श्री. यल्लपा जाधव, रा. सोलापूर,** यांनी अल्कोहोलच्या वापरा विययी विचारणा केली.
**उत्तर :** तांत्रिक सल्लागार यांनी असे सांगितले की, शासनाचा अल्कोहोल हा महसूल मिळण्यासाठी महत्वाचा स्रोत असून तो उत्पादन शुल्क च्या रूपात भरण्यात येतो. त्याव्यतिरिक्त अल्कोहोल अनेक ठिकाणी १) पेट्रोलियम इंधन मिश्रणासाठी २) औषधी कारखान्यामध्ये सॉलव्हंटच्या स्वरूपात ३) विविध कृत्रिम रसायन निर्मीतीसाठी ४) सुगंधी द्रव्ये, सौंदर्य प्रूसाधने आणि वनस्पतीजन्य् अर्क / सुगंध बनविण्यासाठी आणि ५) मद्य व मद्यार्क बनविण्यासाठी वापर करण्यात येतो.

६) **श्री. महादेव गायकवाड, रा. दुधनी,** यांनी प्रकल्पातून निर्णाण होणाऱ्या सांडपाण्याची प्रक्रिया कशी होते अशी विचारणा केली.
**उत्तर :** सुलक्षना आयरेकर यांनी असे सांगितले की, प्रस्तावित ४५ किलोलिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पातून निर्माण होणारे सांडपाण्यामध्ये कच्चे स्पेंटवॉश अंदाजे ३३५ किलो लिटर, स्पेंटलिज अंदाजे ९० किलो लिटर आणि इतर सांडपाणी जसे कुलींग ब्लोडाऊन, प्रयोगशाळा आणि धुण्याची अंदाजे १० किलो लिटर यांचा समावेश असेल. कच्चे स्पेंटवॉश बायो मिथेनेशन प्रकल्प, मल्टीपल ईफेक्ट इव्हॅपोरेशन मध्ये एकाग्रिकरण केलेले अंदाजे २०० घन मिटर प्रतिदिन (अंदाजे ४.४ किलो लिटर / किलो लिटर अल्कोहोलच्या) पुढे बायो कांपोस्टिंग साठी पाठविले जाईल त्यासाठी प्रेसमड बॉयलर अ‍ॅश आणि इस्ट स्लज फिलर मटेरियल म्हणून वापरले जाईल तसेच एमईई कंडेनसेट (१३० घन मिटर / दिन) स्पेंट लिज (९० घन मिटर / दिन) कुलिंग ब्लोडाऊन (५ घमी / दिन) प्रयोग शाळा आणि धुलाई (५ घमी /दिन) हे प्रस्तावित डिस्टीलरीच्या सीपीयु मध्ये प्रक्रिया करून उत्पादन प्रकियेमध्ये परत ते पुर्नवापरासाठी घेऊन मळी सौम्य करण्यासाठी आणि इतर प्रक्रियेसाठी वापरले जाईल. तसेच अस्तित्वात असणारा साखर कारखाना आणि को-जन प्रकल्प यांच्यातून निघणारे अंदाजे २०० घमी/दिन एवढे सांडपाणी, कारखाना स्थळावार असलेल्या पुर्ण क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमध्ये प्रक्रिया करण्यात येत आहे.

आसवणी प्रकल्पातून अंदाजे ४.५ घमी/दिन घरगुती सांडपाणी निर्माण होईल.तर साखर कारखाना आणि को-जन प्रकल्प यांचे २३.५ घमी/दिन असे एकूण २८ घमी/दिन

निघणारे घरगुती सांडपाणी कारखाना स्थळावर उभारण्यात येणाऱ्या स्वतंत्र प्रस्तावित मैला सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया केले जाईल. सद्यस्थितीत साखर आणि को-जन प्रकल्प यातून निघणारे घरगुती सांडपाणी सेप्टिक टॅक व शोष खड्डयामध्ये प्रक्रिया केले जाईल.

७) **श्री. सुधीर कुंभार, रा. रुद्देवाडी** यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नियमितपणे हवा, ध्वनी प्रदूषणाचे मोजमाप केले जाईल का अशी विचारणा केली.
**उत्तर :** सुलक्षना आयरेकर यांनी उत्तरात असे सांगितले की, मप्रनि मंडळाकडून नियमीतपणे हवा, ध्वनी, सांडपाणी यांचे नियमितपणे देखरेख व तपासणी केली जाईल व त्याच बरोबर प्रादेशिक कार्यालयाकडूनही केले जाईल. एवढेच नव्हे तर वैयक्तिक देखरेख तपासणी ही पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय व एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून करण्यात येईल.

८) **श्री. परमेश्वर बापट, रा. रुद्देवाडी,** यांनी रोजगार निर्मीती विषयी प्रश्न उपस्थित केला की, ज्यामध्ये त्यांनी सदर प्रस्तावति प्रकल्पाद्वारे नवीन रोजगार निर्मीतीची संधी मिळेल का याबाबत माहिती जाणून घेण्याची ईच्छा व्यक्त केली.
**उत्तर:** श्री. शिवराज म्हेत्रे यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून उत्तरात सांगितले की, प्रस्तावित आसवणी प्रकल्पाच्या अंतर्गत असणाऱ्या उपक्रमामध्ये कार्यक्षेत्रातील स्थानिक रोजगार आणि कंत्राटी तत्वावर नोकरी यामुळे लोकांचे सामाजिक व आर्थिक जीवनमानामध्ये सुधारणा होईल. प्रस्तावित प्रकल्प स्थानिक कुशल आणि अकुशल, विशेषत: लघु उद्योजक आणि इतर संबंधित सेवा यांना रोजगाराच्या संधी पुरवू शकेल. त्यांनी असेही सांगितले की, मातोश्री लक्ष्मी शुगर आणि को-जन प्रकल्प विविध उपक्रमाद्वारे म्हणजेच साखर कारखाना को-जन प्रकल्प याद्वारे आगोदरच प्राथमकि आणि दुय्यम अशा ४५० लोकांना रोजगार दिलेला आहे. अंदाजे ७० स्थानिक लोकांना प्रस्तावित आसवणी प्रकल्पामुळे रोजगार मिळेल. सल्लगार यांनी स्थानिक लोकांना आवश्यक कुशलता विकसीत करण्याची विनंती केली की, ज्याद्वारे त्यांना प्राधान्यांने प्रकल्पाद्वारे रोजगाराच्या संधी घेता येतील.

९) **श्री. श्रीकांत म्हेत्रे, रा. दुधनी** यांनी प्रस्तावित प्रकल्पाची प्रदूषण नियंत्रण उपाय योजानांविषयीची सविस्तर चौकशी केली. तसेच, त्यांनी स्पेंटवॉश म्हणजे काय असे विचारले.
**उत्तर :** वरील प्रश्नाचे उत्तर देताना सल्लागार यांनी पर्यावरणाच्या दृष्टीने हवा, पाणी ध्वनी, वास, कचरा आणि घातक घनकचरा यांच्या प्रदूषण नियंत्रण व्यवस्थेविषयी सविस्तरपणे सांगितले. पुढे सुलक्षना आयरेकर यांनी स्पेंटवॉश ची व्याख्या सांगितली. त्यांनी सांगितले की, स्पेंट म्हणजे टाकाऊ द्रव आणि ही संज्ञा आसवणीमध्ये

आंबवण्याची प्रक्रिया व उर्ध्वपातान विभागासाठी वापरली जाते. म्हणून स्पेंटवॉश हे दुसरे काही नसून आसवणी पासून बाहेर टाकले जाणारे टाकाऊ द्रव पदार्थ दर्शविते की, जे आंबवणे व उर्ध्वपातन प्रक्रियेच्या पुर्नप्राप्तीतून निर्माण होते. सदर ताज्या स्पेंटवॉशला गडद तपकिरी रंग असतो आणि मोठया प्रमाणात सेंद्रीय पदार्थ असतात, त्यामुळे बायोमिथेनेशन साठी चांगले आहे.

१०) **श्री. गुलाब खैराट, रा. दुधनी** यांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या फायद्याविषयी विचारणा केली.

**उत्तर :** तांत्रिक सल्लागार यांनी स्पष्ट केले की, आसवणी प्रकल्पातून निर्माण होणरे खत हे थेट शेतकऱ्यांना शेतीसाठी देण्यात येईल त्यामुळे जमिनीची सुपिकता वाढून पिकांची व ऊसाचे उत्पादन वाढेल. परिणामी वाढलेले ऊसाचे उत्पादन हे अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्यास आणि शेतकऱ्यास मदतीचे होईल.

वरील प्रश्नउत्तराच्या सत्रानंतर अधिक प्रश्न उपस्थिताकडून आले नाहीत.

श्री. ज. शं. साळुंखे सदस्य यांनी प्रकल्प प्रवक्त्यांनी सीजीडब्युए च्या एनओसी साठी अर्ज केलेला आहे काय?

यावर सल्लागार यांनी कारखाना जरी भुजल आसवणी साठी वापरत नसला तरी सीजीडब्ल्युए एनओसी साठी याअगोदरच अर्ज केलेला आहे आणि तो कार्यवाही मध्ये आहे.

श्री. साळुंखे यांनी भस्मीकरण बाष्पपात्र व वास नियंत्रणासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजनांच्या अंमलबजावणी विषयी विचारणा केली. पुढे स्पेंट वॉश लगून सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या अंतर्गत येतात का असे विचारले.

सल्लागार यांनी सागितले की, सद्यस्थितीत भस्मीकरण पाष्पपात्राची सुविधा नाही. परंतु, भविष्यात त्याचा विचार केला जाईल. प्रस्तावित आसवणीसाठी संगोगी बंधाऱ्यातून पाणी घेतले जाईल. एवढेच नव्हे तर वास नियंत्रणसाठी योग्य देखभाल, चांगले व्यवस्थापन पद्धती आणि स्पेंटवॉशच्या योग्य साठवणूक आणि विल्हेवाट यामुळे वासाचे प्रदूषण नियंत्रणात राहिल त्याचबरोबर प्रस्तावित आसवणी मध्ये हरीत पट्टा विकसीत केला जाईल.

त्यानंतर श्री. किशोर पवार, अध्यक्ष यांनी महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवड मोहीमे अंतर्गत कारखाना परिसरात वृक्ष लागवड करण्याची सुचना केली. त्याचबरोबर त्यांनी बाष्पपात्रासाठी होणारे पाण्याचे पर्नवापर बगॅस वापरून विद्युत निर्मिती याची चौकशी केली. याला सुलक्षना आयरेकर यांनी औद्योगिक प्रक्रियेसाठी १०० टक्के पाण्याचा पुर्नवापर केला जातो व बिगर हंगामात ५२ टक्के पाणी पुर्नवापर केले जाते.

श्री. म्हेत्रे यांनी सांगितले की, सद्याचे बाष्पिपात्र हे विविध इंधनाचे असल्याने बगॅस आणि बायोगॅस यांचा इंधन म्हणून वापर केला जातो. साखर कारखान्याचा बगॅस को-जन प्रकल्पाच्या विज निर्मीतीसाठी वापरला जातो. त्याचबरोबर आसवणीच्या बायोमिथेनेशन प्लांटचा बायोगॅस को-जन बाष्पिपात्रासाठी वापरण्यात येईल.

अध्यक्ष व समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही शंका, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कुठलाही प्रश्न उपस्थित होत नसल्यामुळे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी समन्वयक यांना बैठकीचा समारोप करण्याचे आवाहन केले.

श्री अवताडे, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहून प्रकल्प विस्तारिकरणातील पर्यावरणविषयक प्रश्न विचारले त्याबाबत त्यांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की उपस्थितांनी केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद बैठकीच्या इतिवृतान्तात घेण्यातयेणार असून सदरहू इतिवृत्त अहवालासोबत भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल.

समन्वयक, यांनी अध्यक्षाच्या परवानगीने मा. अध्यक्ष व उपस्थितांचे आभार मानून सुनावणी संपल्याचे जाहिर केले.

सदर पर्यावरणविषयक जाहिर सुनावणीचे कामकाज दुपारी ०३.३० वा. सुरू होऊन ०५.१५ वाजता पूर्ण झाले.

(किशोर पवार)
अध्यक्ष,
पर्यावरण विषयक जाहीर
लोकसुनावणी समिती तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

(न. सं. अवताडे)
समन्वयक तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी
मप्रनि मंडळ, सोलापूर

(ज. शं. साळुंखे)
सदस्य तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे.